आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता याच्या अधिपत्याखालील उप आयुक्त (गट-अ) संवर्गातील अधिकाऱ्यांची दिनांक ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची...

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : ज्येसूची-२०२३/प्र.क्र. ८३ (भाग-१) /प्रशा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ मे, २०२६

वाचा :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. : एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दि. २१.१०.२०११.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र. : एसआरव्ही-२०१६ /प्र.क्र.२८१/१२, दि. २१.०६.२०२१ .
३) शासन परिपत्रक समक्रमांक दि. १७.०४.२०२५.
४) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांचे पत्र क्र. कौविरोवउआ-२/आस्था/राजप/ (०६/२०२६ ) /९९४, दि. १३.०३.२०२६.

**शासन परिपत्रक :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांची ज्येष्ठतासूची प्रत्येक वर्षी तयार करणे व ती प्रसिध्द करणे याबाबतचे सर्वंकष धोरण निश्चित केले आहेत.

२. आयुक्त,कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेतील उप आयुक्त (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्यांची संदर्भ क्र. ३ अन्वये दि. ०१.०१.२०२५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर ज्येष्ठतासूचीच्या आधारे सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ मधील तरतुदीनुसार दि. ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची तयार करण्यात आली असून सोबत जोडलेल्या **" परिशिष्ट-अ "** नुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे.

३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी उप आयुक्त (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्यांची दि. ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची संबधित अधिकाऱ्यांच्या ( रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिका-यांसह ) निदर्शनास आणून देण्यात यावी.

४. उप आयुक्त (गट-अ ) यांचेकडून सदर तात्पुरत्या ज्येष्ठतेसूचीबाबत काही आक्षेप/त्रुटी प्राप्त झाल्यास त्याबाबत आपल्या कार्यालयातील अभिलेख्यांनुसार तपासून आपल्या अभिप्रायासह हे शासन परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत शासनास पाठवाव्यात. विहीत कालावधीत आक्षेप/त्रुटी प्राप्त न झाल्यास सदर तात्पुरत्या ज्येष्ठतासूचीत नमूद केलेल्या अधिका-यांची माहिती/तपशील बरोबर असल्याचे गृहीत धरुन दि. ०१.०१.२०२६ ची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येईल.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०५१३१८०९४०१८०३ असा आहे हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
Date: 2026.05.13 18:11:05 +05'30'

( वैशाली सुळे )

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत : "परिशिष्ट-अ "**

**प्रति:-**

आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय , कोकण भवन, नवी मुंबई.

**प्रत :-**

१) सर्व उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय.
(आयुक्तालयामार्फत)

२) निवड नस्ती. (प्रशा-२ )

शासन परिपत्रक, कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, क्रमांक ज्येसूची-२०२३/प्र.क्र.८३ (भाग-१)/प्रशा-२, दि.१३ मे, २०२६ सोबतचे

" परिशिष्ट-अ "

१) संवर्गाचे नाव : उप आयुक्त (गट अ)

२) वेतनश्रेणी : एस-२३ : ६७७००-२०८७००)

३) दिनांक ०१. ०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची ( दि. ०१.०१.२०२५ ते ३१.१२.२०२५ या कालावधीत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची )

| अ. क्र. | ज्ये. क्र. | नाव | प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक | जन्म तारीख | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नतीने/ सरळसेवेने/मर्यादित विभागीय परिक्षेव्दारे नियुक्त उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक व परीक्षेचे वर्ष) | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय/ शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ७ | ८ | १० | ११ |
| १ | १ | श्री. दि.दे.पवार | वि.जा.(अ) | १२.०८.१९६७ | ३०.०४.२००८ | पदोन्नती | ३०.०४.२००८ | ३१.०८.२०२५ | बी.ई.(मॅकेनिकल) डिप्लोमा इन आर.डी.बी.एम. एस (कॅाम्प्युटर ). | दि. ३१.०८.२०२५ रोजी सेवानिवृत्त |
| २ | २ | श्री. सु.द. सैंदाणे | इ.मा.व. | २८.०५.१९६८ | ०३.०५.२००८ | पदोन्नती | ०३.०५.२००८ | ३१.०५.२०२६ | एम.कॉम. (एम.पी.एस.) | |
| ३ | ३ | श्री. प्र. वि. देशमाने | अ.जा. | १५.०३.१९७० | १८.०२.२०२२ | पदोन्नती | १८.०२.२०२२ | ३१.०३.२०२८ | बी.कॉम मास्टर ऑफ लेबर स्टडीज | |
| ४ | ४ | श्रीम. अ. ऊ. पवार | खुला | ०८.१०.१९६८ | १६.०२.२०२२ | पदोन्नती | १६.०२.२०२२ | ३१.१०.२०२६ | एम.ए.बी.एड | |
| ५ | ५ | श्री. द.ल. ठाकरे | खुला | २५.०३.१९७९ | ३०.११.२०२३ | पदोन्नती | ३०.११.२०२३ | ३१.०३.२०३७ | एम.ए. (इतिहास) | |
| ६ | ६ | श्रीम. वि. सा. शितोळे | खुला | २८.०८.१९८५ | ११.१०.२०२४ | पदोन्नती | ०७.१०.२०२४ | ३१.०८.२०४३ | एम.ए. (अर्थशास्त्र) जी.डी.सी.ॲन्ड ए. | |
| ७ | ७ | श्री. स.ता. जाधव | खुला | ०२.०५.१९८४ | ०७.१०.२०२४ | पदोन्नती | ०७.१०.२०२४ | ३१.०५.२०४२ | बी.ई.(कॅाम्प्युटर ). | |